PHKM-U-MRTH

मराठी / MARATHI

प्रश्न-पत्र I / Paper I

(साहित्य) / (LITERATURE)

वेळ : **तीन** तास *Time Allowed : **Three** Hours*	कमाल अंक : **250** *Maximum Marks : **250***

प्रश्नपत्रिकेबाबतच्या ठळक सूचना

उत्तरपत्रिका लिहिण्यापूर्वी कृपया पुढील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात :

आठ *प्रश्नांची विभागणी* ***दोन भागांमध्ये*** *केलेली आहे.*

उमेदवाराला एकूण ***पाच*** *प्रश्न सोडवावयाचे आहेत.*

प्रश्न क्रमांक ***1*** *आणि* ***5*** *हे अनिवार्य आहेत. आणि उर्वरित प्रश्नांपैकी* ***तीन*** *प्रश्न सोडवताना प्रत्येक विभागातील किमान* ***एक*** *तरी प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.*

प्रश्न/भागाने घेतलेल्या गुणांची संख्या त्याच्या विरुद्ध दर्शविली जाते.

मराठीतच *उत्तरे लिहावीत.*

ज्या प्रश्नांमध्ये शब्दमर्यादा उल्लेखलेली असेल, तिचे कटाक्षाने पालन करावे.

प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न अनुक्रमानेच गृहीत धरले जातील. एखाद्या प्रश्नाचा अंश जरी सोडविलेला असेल, तरी जर तो खोडलेला नसेल तर गृहीत धरला जाईल. कोणतेही पृष्ठ अथवा पृष्ठाचा काही भाग प्रश्नोत्तरपुस्तिकेत कोरा सोडला असेल, तर त्यावर काट मारावी.

QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

Please read each of the following instructions carefully before attempting questions :

There are ***EIGHT*** *questions divided in* ***TWO SECTIONS.***

Candidate has to attempt ***FIVE*** *questions in all.*

Questions no. ***1*** *and* ***5*** *are compulsory and out of the remaining,* ***THREE*** *are to be attempted choosing at least* ***ONE*** *question from each section.*

The number of marks carried by a question / part is indicated against it.

Answers must be written in ***MARATHI.***

Word limit in questions, wherever specified, should be adhered to.

Attempts of questions shall be counted in sequential order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.

Optional Province · optionalprovince.com

SECTION A

Q1. पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे एकशेपन्नास (150) शब्दांत लिहा : *10×5=50*

(a) बोली भूगोल संकल्पना स्पष्ट करून अहिराणी बोलीचे वेगळेपण नोंदवा. *10*

(b) भाषा व्यवस्था आणि भाषा व्यवहार या दोन भाषिक स्तराचे विवेचन करा. *10*

(c) मराठीतील विभक्तीविचार स्पष्ट करून द्वितीया आणि चतुर्थी विभक्तीचे साम्यभेद लिहा. *10*

(d) मराठी लोककथांमधून आदिबंध आणि कल्पनाबंध कसे आविष्कृत होतात, हे सोदाहरण लिहा. *10*

(e) नोम चॉम्स्की यांची भाषिक क्षमता (competence) संकल्पना स्पष्ट करा. *10*

Q2. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) प्रमाणभाषा आणि बोलीभाषा यांच्या सहसंबंधाची चर्चा करा. *20*

(b) मराठीतील प्रयोगविचार सांगून कर्मणी प्रयोगाचे उपप्रकारासह सोदाहरण विवेचन करा. *15*

(c) मराठी लोकगीत परंपरा प्रकार-भेदांसह विशद करा. *15*

Q3. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) लोकनाट्याचे स्वरूप सांगून 'तमाशा' सादरीकरणाचे वेगळेपण सांगा. *20*

(b) भाषेचे स्वरूप स्पष्ट करून भाषेचे कार्य लिहा. *15*

(c) विशेषण आणि क्रियाविशेषण यातील फरक सांगून क्रियाविशेषणाच्या प्रकाराचे विवेचन करा. *15*

Q4. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) धातू म्हणजे काय हे सांगून क्रियापदाचे प्रकार स्पष्ट करा. *20*

(b) प्रमाणभाषेपेक्षा वऱ्हाडी बोली कशी वेगळी ठरते, सोदाहरण लिहा. *15*

(c) साहित्यभाषेच्या ठळक विशेषांची चर्चा करा. *15*

Optional Province · optionalprovince.com

SECTION B

Q5. पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे एकशेपन्नास (150) शब्दांत लिहा : *10×5=50*

(a) संत तुकारामांच्या अभंगातील अवतरण क्षमता (प्रेरणादायी सुविचार) सोदाहरण लिहा. *10*

(b) पंडिती कवितेचे वाङ्मयीन विशेष व मर्यादा लिहा. *10*

(c) बखर वाङ्मयाचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये लिहा. *10*

(d) साहित्यातील वास्तववादाचे विशेष व मर्यादा स्पष्ट करा. *10*

(e) आदिबंधात्मक समीक्षेची संकल्पना स्पष्ट करा. *10*

Q6. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) महानुभाव साहित्याने मराठी भाषा व साहित्याला दिलेल्या योगदानाची चर्चा करा. *20*

(b) विजय तेंदुलकर यांच्या नाट्यलेखनाचे वेगळेपण सोदाहरण लिहा. *15*

(c) ह.ना. आपटे यांच्या कादंबरीचे विशेष साधार विवेचन करा. *15*

Q7. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) महात्मा ज्योतिराव फुले यांच्या साहित्यातील आधुनिकतेचे स्वरूप उलगडून सांगा. *20*

(b) साहित्य समीक्षेचे स्वरूप सांगून वाङ्मय व्यवहारातील समीक्षेची आवश्यकता अधोरेखित करा. *15*

(c) शाहिरी कवितेचे प्रकार सांगून पोवाड्याचे वेगळेपण सोदाहरण स्पष्ट करा. *15*

Q8. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) साठोत्तरी साहित्य प्रवाहांच्या निर्मितीच्या कारणांची चर्चा करा. *20*

(b) 'अर्वाचीन मराठी काव्याच्या इतिहासात रविकिरण मंडळाची कामगिरी मोलाची राहिली आहे' या विधानाची साधक-बाधक चर्चा करा. *15*

(c) लघुकथेचे विशेष सांगून दिवाकर कृष्ण यांच्या लघुकथेतील योगदानाचे विवेचन करा. *15*

Optional Province · optionalprovince.com